**एस.सी.सी.क्र. ८४९/२०१८**
**नि. २४**

**सरकारतर्फे सा.क्र.४**

**शपथेवर**

**नांव** : जयवंत रकमनाथ तोडमल, पो. हे. कॉ./११९३

**वय** : ४१ वर्षे , धंदा : नोकरी,

**सध्या नेमणुक :** श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन, ता.श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर.

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** -

१. दि. २७/०३/२०१८ रोजी मी नेवासा पोलीस ठाणे येथे पो. नाईक म्हणुन कार्यरत होतो.सदर दिवशी पोलीस हे. कॉ. गायकवाड, कचे, दरंदले, पवार आणि मी पोलीस स्टेशनला हजर असताना पोलीस निरीक्षण यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम बाजारतळ बेलपिंपळगाव येथे देशी दारूची अवैद्यरित्या विक्री करत आहे.त्यानंतर पोलीस निरीक्षण यांच्या आदेशानुसार छापा कारवाई करण्याकरीता आम्ही निघालो त्यावेळी पो. हे. कॉ. गायकवाड यांनी दोन पंचाना बोलावुन घेउन आम्ही सर्व जण खाजगी वाहनाने घटनास्थळी १८.०० वा. सुमाराच्या छापा टाकला. त्यावेळी तेथे एक इमस मिळालेल्या बातमीप्रमाणे देशी दारूची विक्री करताना मिळुन आल्याने त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नावे सुखदेव सखाराम शेंडगे, वय ६२, रा. बेलपिंपळगाव असे सांगितले. त्यानंतर त्याला अंगझडतीचा उद्देश समजावुन सांगुन त्याने अंग झडती साठी संमती दिल्यानंतर अंग झडतीत त्याच्याकडुन ८८४ रूपयाच्या एकुण १७ बॉबी संत्रा देशी दारूच्या बॉटल्स मिळुन आल्या. त्यानंतर सदर मुद्देमालाचा जप्ती पंचनामा मी पोलीस कॉ. गायकवाड यांच्यासमोर केला. जप्त मुद्देमालातील एक बाटली केमिकल ॲनालाईजर नाशिक यांच्याकडे तपासणीसाठी पाठवण्याकरीता राखुन ठेवली. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते.त्यानंतर जप्त मुद्देमाल व आरोपीला पोलीस ठाण्यात घेउन आलो. पो. कॉ. दरंदले यांनी आरोपीविरूद्ध फिर्याद दिली. त्यानंतर जप्त केलेला मुद्देमाल मुद्देमाल कारकुन यांच्याकडे मुद्देमाल पावती तयार करून दाखल केला. आता ती मुद्देमाल पावती

मला दाखविण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

२. त्यानंतर प्रस्तुत गुन्हयाचा तपास वरीष्ठांच्या लेखी आदेशाने माझ्याकडे देण्यात आला.तो लेखी आदेश आता मला दाखविण्यात आला. त्यावर पो. ठाणे अंमलदार यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्ययात येते. लेखी आदेशासोबत मला फिर्याद, दैनिक अहवाल, पंचनामा इ. कागदपत्रे दिली होती. त्यानंतर वरीष्ठांच्या आदेशानुसार आरोपीची अटकपुर्व वैद्यकीय तपासणी करून त्याला अटक केली. तपासामध्ये मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. अटक आरोपीला न्यायालयासमोर उपस्थित केले. न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत घेतले. त्यानंतर जप्त केलेली बाटली रासायनिक तपासणीकरीता रासायनिक प्रयोगशाळा नाशिक येथे पाठवली.त्या पत्राची स्थळ प्रत आता मला दाखविण्यात आली. त्या स्थळ प्रत पत्रावर माझी, पो. नि. यांची सही आहे तसेच प्रादेशिक रासायनिक प्रयोगशाळा येथील लिपीकाची पोहोच म्हणुन सही आहे. त्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २८** देण्ययात येते.तपासाअंती आरोपीविरूद्ध पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. तपासाअंती असे निष्पन्न झाले की, आरोपीने विना परवाना देशी दारूची विक्री केली व महाराष्ट्र दारू बंदी कायद्याअंतर्गत गुन्हा केला. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात उपस्थित नाही. (**निशाणी २३ वर आरोपीचा गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल. सदर अर्ज आरोपीची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर मान्य करण्यात आला.)**

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. पी.सी. नहार यांचे मार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी छापा कारवाई करण्याकरीता वरीष्ठांचा लेखी आदेश नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ बाजारतळ बेलपिंपळगाव येथे ब-यास लोकांची गर्दी असते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावरून मुद्देमाल जप्त न करता जप्ती पंचनामा हा पोलीस ठाण्यातच तयार केला. हे म्हणणे खरे नाही की,

जप्ती पंचनाम्यावर आमच्या नेहीमीच्या पंचांच्या सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, चुकीचा तपास करून आरोपीविरूद्ध खोटे दोषोरापपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यावरून केसेसचा कोटा पुर्ण करण्याकरीता खोटी फिर्याद दाखल करून खोटा तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
**स्वाक्षरीत/-**
(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ४, नेवासा.

दिनांक :११/०२/२०२६.